# महाराष्ट्र शासन

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,
मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in


क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.२२३/एसएम-२ दिनांक:- १५ मार्च, २०२३.

## मान्यता पत्र

प्रति,
अध्यक्ष / सचिव,
अक्षरनंदन एज्युकेशन अॅन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे.

विषय- महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

अक्षरनंदन एज्युकेशन अॅन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, गट क्र.६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे (फक्त मुलींसाठी).

संदर्भ:-१.इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.२२३/एसएम-२, दि. २५.१०.२०२१.
२. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण तथा आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.शिसं/माध्य/स्वयंअर्थ/२०२२-२३/एस-४/८२८, दि.०८.०२.२०२३.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत अक्षरनंदन एज्युकेशन अॅन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून उन्नती कन्या विद्यालय, गट क्र.६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) (फक्त मुलींसाठी) ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून अक्षरनंदन एज्युकेशन अॅन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, गट क्र.६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा) (फक्त मुलींसाठी)या शाळेस स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटी व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटी व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे :-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तींची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तींची पूर्तता करील.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

# प्रथम मान्यता

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/आप्रागा1/1601/ ३९९ /2023 पुणे I दिनांक: 15 /09/2023

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,

अक्षरनंदन एज्युकेशन अँन्ड फौंडेशन, उरळीकांचन, पुणे संचालित
उन्नती कन्या विद्यालय, ( 27250507724 ) गट क्र. 617/4/5/2, उरळीकांचन,पुणे

विषय - सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

संदर्भ - 1.शासन निर्णय क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.223/एसएम-2, दिनांक 15/03/2023 शालेय शिक्षण मंत्रालय, मुंबई

2.मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/माध्य-301/स्वयं अ.शा./2022-2023/3463, दिनांक 27/03/2023

3. शाळेकडील प्रथम मान्यता प्रस्ताव दिनांक 04/05/2023

4. श्रीम. निर्मला मंडे, वि.अ.शिक्षण, जि.प. पुणे यांचा तपासणी अहवाल दिनांक05/09/2023

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने प्रथम मान्यता करीता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार व तपासणी अधिकारी यांनी केलेल्या शिफारशी नुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र .1 ते 4 नुसार खालील अटी व शर्तीवर इयत्ता 1ली ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | सुरु वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | अक्षरनंदन एज्युकेशन अँन्ड फौंडेशन, उरळीकांचन, पुणे | उन्नती कन्या विद्यालय, ( 27250507724 ) गट क्र. 617/4/5/2, उरळीकांचन,पुणे | इंग्रजी सी.बी.एस.ई. | नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित | इयत्ता 1ली ते इयत्ता 8 वी | 2023-24 |

### अटी व शर्ती

1. मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात शासनाच्या परवानगीशिवाय कोणताही बदल करता येणार नाही.
2. शाळा व्यवस्थापनाने शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर त्या शाळेची परवानगी रद्द होईल.
3. स्वयंअर्थ सहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमानुसार व विनियमानुसार करण्यात यावी.
4. परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांच्या मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थ सहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतुदींचे पालन करणे बंधनकारक राहील.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयं अर्थ सहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा , मंडळ संलग्नता क्रमांक, UDISE कोड इ. तपशील दर्शविणारा फलक लावणे बंधनकारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन मान्यता पत्र क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.223/एसएम-2, दिनांक 15/03/2023 मधील सर्व अटी व शर्ती पुर्ततेच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयं अर्थसहाय्यित शाळा म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10 शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी निर्गत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.
11 भविष्यात या शाळेची प्रथम मान्यता बाबत कोणत्याही स्वरुपाची तक्रार प्राप्त झाल्यास अथवा न्याय प्रविष्ठ प्रकरण उद्भवल्यास सदरचा प्रथम मान्यता आदेश रद्द करण्यात येईल.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

महाराष्ट्र शासन
शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे १ यांचे कार्यालय
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लाल देवळासमोर, पुणे -१
दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१२२२१७ फॅक्स क्रमांक ०२०-२६१२५६९६
ई मेल आय.डी.क्रं dydpune@gmail.com वेब साईट आयडी क्रमांक www.dydepune.co.in


जा.क्र. शिउसं/माध्य-३०१/ स्वयं.अ.शा./२०२२-२०२३ /3823 दिनांक : 27 MAR 2023

प्रति,
अध्यक्ष/सचिव, अक्षरनंदन एज्युकेशन सोसायटी अँन्ड फौंडेशन,
उरळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे

विषय : महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून इ. १ ली ते इ. १२ वी स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत.
अक्षरनंदन एज्युकेशन सोसायटी अँन्ड फौंडेशन, उरळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, गट क्रं.६१७/४/५/२, उरळी कांचन, पुणे (फक्त मुलींसाठी)

संदर्भ : १. श्री.प्रदिप पडोळे,कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन मुंबई-३२ यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र. एसएफएस-१०२१/प्र.क्र. २२३/एसएम-२, दिनांक १५/३/२०२३
२ अध्यक्ष/सचिव, अक्षरनंदन एज्युकेशन सोसायटी अँन्ड फौंडेशन, उरळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे यांचे पत्र दिनांक ६/२/२०२३

उपरोक्त विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, अक्षरनंदन एज्युकेशन सोसायटी अँन्ड फौंडेशन, उरळी कांचन, ता.हवेली, जि.पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, गट क्रं.६१७/४/५/२, उरळी कांचन, पुणे (फक्त मुलींसाठी) या प्राथमिक ते उच्च माध्यमिक इ. १ ली ते इ. १२ वी इंग्रजी माध्यम, सर्व शाखा, सी.बी.एस.ई. संलग्नित शाळेस संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ पासून सदर नवीन शाळा सुरु करण्याची मान्यता संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशातील अ.क्र. १ ते १२ च्या अटी व शर्तीस अधिन राहून देण्यांत आलेली आहे.

सदर अटी व शर्ती आपल्या संस्थेस/शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(औदुंबर उकिरडे)
अध्यक्ष,क्षेत्रस्तरीय प्राधिकरण,
तथा शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण तथा मा.आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे
२. मा. सदस्य सचिव, तथा मा.शिक्षण सहसंचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. श्री. प्रदिप पडोळे, कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/ माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

# पुणे जिल्हा परिषद , पुणे

शिक्षण विभाग (प्राथमिक)

यशवंतराव चव्हाण भवन, १ वेलस्ली रोड कॅम्प, पुणे ४११ ००१

ई मेल punezpprivate@gmail.com वेबसाईट https: / /punezp.mkcl.org

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा१/२७४७/६८० /२०२३ दिनांक ३१ /१०/२०२३

वाचा:- १) या कार्यालयाकडील प्रथम मान्यता जा.क्र.जि.प.शिक्षण/ प्राथ/खाप्राशा/स्वयंअशाळा/१६०१/५६६९/२०२३, दिनांक १५/०९/२०२३

२) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. एसएफएस-१०२१/प्र.क्र.२२३/एसएम-२, दिनांक १५/०३/२०२३

३) मा. शिक्षण उपसंचालक यांचेकडील जा.क्र.शिउसं/माध्य-३०१/स्वयं.अ.शा./२०२२-२०२३/३४६३, दिनांक २७/०३/२०२३

## शुध्दीपत्रक

अक्षरनंदन एज्युकेशन ॲन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, (२७२५०५०७७२४) गट क्र.६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे, इंग्रजी सी.बी.एस.ई. नवीन शाळा स्वयंअर्थसहाय्यित, इयत्ता १ ली ते ८ वी प्रथम मान्यता जा. क्र. जि.प.शिक्षण/ प्राथ/ खाप्राशा/ स्वयंअशाळा/१६०१/ ५६६९/ २०२३, दिनांक १५/०९/२०२३ मधील तक्त्यातील मान्यता मिळालेल्या शाळेचे नावामध्ये खालील प्रमाणे वाचावे:-

अक्षरनंदन एज्युकेशन ॲन्ड फौंडेशन, उरुळीकांचन, पुणे संचलित उन्नती कन्या विद्यालय, (२७२५०५०७७२४) गट क्र. ६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे **(फक्त मुलींसाठी)** असे वाचावे.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी प्राथमिक
पुणे जिल्हा परिषद पुणे

प्रति,

अक्षरनंदन एज्युकेशन ॲन्ड फौंडेशन,उरुळीकांचन,पुणे संचलित
उन्नती कन्या विद्यालय, (२७२५०५०७७२४)
गट क्र.६१७/४/५/२, उरुळीकांचन, पुणे(फक्त मुलींसाठी)